# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/01/2023 (शुक्रवार) दुपार

---

## चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १७ कि.मी. अंतरावरील चाचेर शेतशिवार येथे दिनांक ०९/०१/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक १०/०१/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— इकबाल हपीज शेख, वय ५० वर्ष, रा. चाचेर ता. मौदा यांचे शेतातील टाटा कंपनीचे सौर उर्जा पंप ३ एच पी. चे मोटार पंप बंद करून नमुद घटनावेळी फिर्यादी हे मोटार पंप चालु करण्यास शेतात गेले असता शेतात लागलेली टाटा कंपनीचे १) सौर उर्जा पंप ३ एच पी. चे मोटार पंप २) इलेक्ट्रीक वायर ३) नायलॉन रस्सा असा एकुण किंमती अंदाजे ३५,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ओमप्रकाश कोडवते ब. नं. ७८८ पो.स्टे. रामटेक मो. नं. ९५४५८४४७८८ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील वार्ड क्र. ०८ नरखेड येथे दिनांक १९/०१/२०२३ रोजी दुपारी ०१.०० वा. ते ०३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— चंद्रशेखर गोपालराव नाडेकर, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०८ नरखेड तह. नरखेड हे अकरमासाचे कार्यक्रमाला आपल्या राहाते घराला कुलुप लावुन आपले परीवारासह गेले असता फिर्यादीच्या घराच्या दरवाज्याचे कुलुप तोडुन घरामध्ये प्रवेश करून आलमारीचे लॉकरमध्ये ठेवलेले पर्स मधील असा एकुण नगदी ३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक हरिश्चंद्र गावडे पोस्टे नरखेड मो. नं. ८४२४०४३१३५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**